पाटपन्हाळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

जिमखाना विभाग- वार्षिक अहवाल

(२०१६-१७)

---

- **आंतर -महाविद्यालयीन क्रॉस कंट्री, (फिनोलेक्स महाविद्यालय, रत्नागिरी)** :

  २९ ऑगस्ट २०१६ रोजी फिनोलेक्स महाविद्यालय, रत्नागिरी येथे संपन्न झालेल्या आंतर -महाविद्यालयीन क्रॉस -कंट्री स्पर्धेत मुले व मुलींचा संघ सहभागी झाला होता. मुलींच्या संघाने सांघिक गटात तृतीय क्रमांक पटकावला. ६ मुलींना प्रत्येकी कास्य पदक, प्रमाणपत्र, १० मार्क व महाविद्यालयासाठी चषक असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कु. टेरवकर राणी रामचंद्र, सकपाळ स्वाती देवजी, रामाणे स्वप्नाली सोनू, टेरवकर ज्योती पांडूरंग, चव्हाण सायली महादेव, पंडित भाग्यश्री या कास्य पदकाच्या मानकरी ठरल्या.

- **आंतर -महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत सहभाग-**

  १५-१०-२०१६ रोजी चाफे महाविदयालय येथे संपन्न झालेल्या आंतर - महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेत मुलांच्या संघ सहभागी झाला होता.

- **आंतर -महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेचे आयोजन-**

  १९ -१०-२०१६ रोजी आंतर -महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेचे ( झोन ५ )आयोजन यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये १६ महाविदयालयानी सहभाग नोंदविला. गोगटे जोगळेकर महाविदयालयाने यामध्ये विजेतेपद मिळविले

- **वार्षिक क्रिडा स्पर्धा** :

  दि. १९ ते २१ जानेवारी २०१७ मध्ये महाविद्यालयाच्या वार्षिक क्रिडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे उत्साहाने घेण्यात आल्या. कबड्डी, खो-खो, क्रिकेट या सांघिक स्पर्धांमध्ये सर्वच वर्गांनी सहभाग नोंदविला. धावणे, कॅरम, थाळीफेक, गोळाफेक या वैयक्तिक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सर्व सांघिक स्पर्धांमध्ये प्रत्येक वर्गातील मुलींनी सहभाग नोंदविला.

- **पाटपन्हाळे मॅरेथॉन स्पर्धेत यश** :

  दि. ८ जानेवारी २०१७ रोजी पाटपन्हाळे एज्यूकेशन सोसायटीने आयोजित जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत महाविदयालयाच्या २२० विदयार्थोनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये खुला गट (महिला) मध्ये

कु. स्वप्नाली सोनू रामाणे व ज्योती पांडुरंग टेरवकर यांनी अनुक्रमे चौथा व पाचवा क्रमांक मिळवला. तसेच खुला गट (पुरुष) मध्ये कु. अंकित अनंत म्हादलेकर याने पाचवा क्रमांक मिळवला.

- **रायगड चढणे व उतरणे** : दि. २३/०२/२०१७ रोजी रायगड येथे संपन्न झालेल्या आंतर - महाविद्यालयीन रायगड चढणे व उतरणे या स्पर्धेत महाविद्यालयाचा सहभाग होता. या स्पर्धेत मुलांच्या गटात ०९ व मुलींच्या गटात ०६ विद्यार्थीनींचा सहभाग होता. मुलांच्या व मुलींच्या गटामध्ये सांघिक गटामध्ये चौथा क्रमांक मिळविला.

मंगळवार, ५ सप्टेंबर २०१७ प्रहार १२

## क्रॉस-कंट्रीमध्ये पाटपन्हाळे महाविद्यालयाचे यश



आंतर महाविद्यालयीन क्रॉस-कंट्री स्पर्धेतील पाटपन्हाळे महाविद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थिनींना गौरविताना मान्यवर.

गुहागर (शहर वार्ताहर)

मुंबई विद्यापीठाची आंतर महाविद्यालयीन क्रॉस-कंट्री स्पर्धा बिर्ला महाविद्यालय कल्याण येथे नुकतीच पार पडली. यामध्ये ८८ हून अधिक महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता.

पाटपन्हाळे महाविद्यालयातील मुले व मुलींच्या दोन्ही गटांनी सहभाग नोंदविला. मुलींच्या सांघिक गटाने विद्यापीठस्तरावर तृतीय येण्याचा मान मिळविला. प्रत्येकी एक कास्यपदक, प्रमाणपत्र, महविद्यालयासाठी चषक या वर्षासाठी प्रत्येकी १० मार्क असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यामध्ये राणी टेरवकर, स्वप्नाली रामाणे, ज्योती टेरवकर, अस्मिता मोहिते, शीतल महाडिक, अक्षता विचारे यांनी यश मिळविले. त्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल पाटपन्हाळे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष भालचंद्र चव्हाण, सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व पाटपन्हाळे परिसरातून देखील अभिनंदन करण्यात येत आहे. यासर्व विद्यार्थ्यांना जिमखाना विभागप्रमुख एस. एस. खोत यांचे मार्गदर्शन लाभले.

२०१६-१७ या वर्षात आंतर-महाविद्यालयीन स्तरावर ०६ पदके मिळवून महाविद्यालयाच्या नावलौकीकात मोलाची भर घातली.

जिमखाना विभाग प्रमुख
प्रा खोत एस एस